# सूतनिर्यातीत दहा टक्क्यांनी घट

## चीनकडून कमी मागणीचा परिणाम; प्रोत्साहनपर धोरणांची गरज

**कोईम्बतूर, तमिळनाडू :** एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत देशातून ४६४ दशलक्ष किलो सूत निर्यात झाले असून गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे दहा टक्क्यांनी घट झाली आहे. भारतीय सूताला चीनकडून मागणी कमी झाल्याने मोठा फटका बसत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार चीनला होणारी भारतीय सूत निर्यात ही मूल्य आणि आकार या दोन्ही बाबतीत कमी झाली आहे. एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत चीनला १०५.९ दशलक्ष किलो सूत जहाजाद्वारे पाठविण्यात आले आहे. २०१३-१४ मध्ये सूती धागा निर्यातीने ४.५ अब्ज डॉलर्सचा विक्रमी टप्पा ओलांडला होता. या काळात स्पिनिंग मिल्समध्ये २ टक्के वाढीची निर्यात प्रोत्साहन, २ टक्के व्याज सुविधेसह आणि ३ टक्के फोकस मार्केट प्रोत्साहन यासह विविध सवलतींमुळे निर्यातीला लाभ झाला होता.



तथापि, २०१४ मध्ये कापूस बाजाराला देण्यात येणारी निर्यात प्रोत्साहन योजना काढून घेण्यात आली. यामुळे २०१६ मध्ये धागा निर्यात घटून घटून ३.३ अब्ज डॉलरवर आली. सीआयटीआयचे अध्यक्ष संजय कुमार जैन याविषयी म्हणाले, की या धोरणाचा फटका भारताचा सर्वात मोठा सूत आयातदार असलेल्या चीनद्वारे मागणी कमी केल्याने बसला आहे. २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत चीनला होणारी भारतातील कापूस सूत निर्यात ४२ टक्क्यांनी घटली आहे, तर व्हिएतनाम व इंडोनेशियाची निर्यात या कालावधीत मात्र अनुक्रमे ८३% आणि १४% वाढली.

> “ केंद्राने घेतलेल्या काही धोरणांचा सूत निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. व्हिएतनाम आणि इंडोनेशियात आयातशुल्क नसल्याने चीनने भारतीय सूत आयात करण्याऐवजी आपला मोर्चा तिकडे वळविला आहे.
> – **संजय कुमार जैन,** अध्यक्ष, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्सटाईल इंडस्ट्री

## तारिक अन्वर रुग्णालयात



नवी दिल्ली : माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एनसीपी) खासदार तारिक अन्वर यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे त्यांना उपचारांसाठी मंगळवारी (ता. २६) एअर अँब्युलन्सने दिल्लीत हलविण्यात आल्याची माहिती पक्षाच्या प्रवक्त्याने दिली. 'राष्ट्रवादी'चे सरचिटणीस असलेले अन्वर (वय ६६) यांची प्रकृती सोमवारी बिहारमधील कटिहार येथे असताना अचानक बिघडली. कटिहारहून ते पाटण्याला जाणार होते, मात्र, तब्बेत बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा नियोजित दौरा रद्द करण्यात आला आहे..

## कुलभूषण यांच्या वैद्यकीय अहवालावर प्रश्न



नवी दिल्ली : हेरगिरीच्या आरोपाखाली पाकिस्तानने कैदेत असलेले भारताचे निवृत्त नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांचा वैद्यकीय अहवाल खोटा असल्याचे समोर येत आहे. पाकिस्तानने दुबईतील सौदी जर्मन हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी हा अहवाल दिल्याचा दावा केला आहे. हेरगिरी आणि घातपाती कारवायांप्रकरणी पाकिस्तानने कुलभूषण जाधव यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. सध्या जाधव हे पाकच्या कैदेत असून, सोमवारी (ता. २५) जाधव यांच्या पत्नी आणि आईने त्यांची भेट घेतली. या भेटीनंतर पाकिस्तानने कुलभूषण जाधव यांचा वैद्यकीय अहवाल जाहीर केला होता. प्रत्यक्षात रुग्णालय प्रशासनाने एका खासगी वृत्तवाहिनीशी बोलताना आमच्या रेकॉर्डमध्ये कुलभूषण जाधव नावाचा रुग्णच नाही, असे म्हटले आहे.

## जयराम ठाकूर हिमाचलच्या मुख्यमंत्रिपदी



**शिमला, हिमाचल प्रदेश :** भाजप नेते जयराम ठाकूर बुधवारी (ता. २७) मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत. राज्यपाल आचार्य देव व्रत यांनी ठाकूर यांच्यासह इतर दहा जणांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. ठाकूर हे हिमाचल प्रदेशचे सहावे मुख्यमंत्री असतील.

शिमल्यातील रिज मैदान येथे हा शपथविधी सोहळा पार पडला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवानी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि इतर राज्यांतील मुख्यमंत्री या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.



**ईरी, पेन्सिल्व्हानिया : येथे मंगळवारी (ता. २६) विक्रमी हिमवृष्टी झाल्याचे क्लेव्हलँड येथील राष्ट्रीय हवामान केंद्राने सांगितले आहे. चक्रीवादळामुळे येथे सुमारे ३४ इंच बर्फ पडला असून त्यातून मार्ग काढताना महिला.**

## ट्रिपल तलाकचे विधेयक आज संसदेत




**नवी दिल्ली :** मुस्लिम समाजामध्ये प्रचलित असलेली ``ट्रिपल तलाक''ची प्रथा हा फौजदारी गुन्हा ठरवून त्यासाठी पतीला तीन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करणाऱ्या प्रस्तावित कायद्याचे विधेयक गुरुवारी (ता. २८) लोकसभेत मांडले जाणार आहे.

या कायद्यात तलाक देण्यात आलेल्या महिलेला व तिच्या मुलांना पोटगी देण्याचीही तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाने ट्रिपल तलाक बेकायदा ठरवूनही तो सुरूच असल्याने हा कायदा करण्यात येत आहे. हा नवा कायदा अस्तित्वात आल्यानंतर पतीला तोंडी तलाक देण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा दाखल होऊन त्याला तुरुंगवास भोगावा लागणार आहे. कारण ट्रिपल तलाक दिल्यास तीन वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद यामध्ये आहे.

कायदामंत्री रविशंकर प्रसाद हे विधेयक संसदेत सादर करतील. या विधेयकांतर्गत बोलून, लिहून, ई-मेल, मेसेज किंवा व्हॉट्सअॅपद्वारे यानुसार कोणत्याही पद्धतीने दिला गेलेला ट्रिपल तलाक बेकायदा व अमान्य असेल आणि कायद्यानुसार संबंधित पतीला ३ वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.

